**माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ मधील तरतूदींच्या अंमल बजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५ /प्र.क्र.(२५२/१५) सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २८.१. २०१६.

**पहा-** मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे क्र.मुमाआ २०१५/तक्रार क्र.१३९८/२०१५/०२ दि. १८.११.२०१५ चे आदेश.

**परिपत्रक:-**

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) (क) मधील तरतूदीनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात अभिलेख सुचिबध्द करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक आहे. अधिनियमातील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करून ती प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. अशी माहिती वेबसाईटवर प्रसिध्द केल्याने जनतेस माहिती विनासायास व विनामुल्य मिळेल. परिणामी सार्वजनीक प्राधिकरणाच्या कामात पारदर्शकता येईल. या अनुषंगाने, ज्या कार्यालयांनी संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत केली नसेल त्यांनी ती तातडीने अद्ययावत करण्याच्या सूचनाही शासन परिपत्रक क्र.केमाअ २०१३/१५६/३६०/सहा दि.९.५.२०१४ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तरीही काही विभागांकडून संकेतस्थळावरील (website) वरील माहिती अद्ययावत केली जात नसल्याचे, श्री.विवेक वेलणकर यांनी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये, मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे केलेल्या तक्रारीमध्ये (Mumma २०१५/Com.no.१३९८/२०१५/०२) मध्ये निदर्शनास आणले आहे. सदर तक्रार निकाली काढताना, शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दि. १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत करावी, मात्र अधिकाऱ्यांसंदर्भातील काही माहिती, जसे बदल्यांबाबतची माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी आणि सदर माहिती संकेतस्थळावरील (website) वर दर्शविली जाईल याबाबत, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुनिश्चिती/खातरजमा करावी असे मा.राज्य माहिती आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव महोदयांना आदेशित केले आहे. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, शासन असे आदेश देत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनातील सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी दरवर्षी दि. १ जानेवारी व १ जुलै रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा संकेतस्थळावरील (website) माहिती अद्ययावत करावी. अधिकाऱ्यांसंदर्भातील काही माहिती जसे बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जावी.

३. वरिलप्रमाणे माहिती संबंधीत संकेतस्थळावर (website) वर दर्शविली जाईल याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने खातरजमा करावी

४. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१५२०१६७००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajendra M Jadhav

Digitally signed by Rajendra M Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=656ebca17998fd5c29178a5abcf1aa60d72bd5515ddc791d9ad9786418f07e4f, cn=Rajendra M Jadhav
Date: 2016.01.28 15:21:18 +05'30'

**( रा.मा.जाधव )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३) सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११) मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१४) सर्व मंत्रालयीन विभाग
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) महासंचालक, यशदा, पुणे
१७) सर्व जिल्हाधिकारी
१८) निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

<u>***पत्राने**</u>